Gymkhana Club challenges eviction

ANI
New Delhi, July 4

THE DELHI GYMKHANA Club and its Staff Welfare Association have approached the Delhi High Court challenging the Centre's decision to initiate eviction proceedings against them from the Club's existing premises at 2, Safdarjung Road in Lutyens' Delhi.

The matter has been listed before the bench of Justice Avneesh Jhingan on July 6, when the court is scheduled to hear the petitions filed by the Club and the Staff Welfare Association.

The petitions come after the Centre initiated statutory eviction proceedings against the Club, alleging that it has become an unauthorised occupant following the termination of its perpetual lease. The government has further stated that it directed the Club to hand over peaceful possession by June 5. According to the plaint, the Club failed to vacate the premises despite the notice and has continued to remain in occupation.

Recently, the Estate Officer had issued a show-cause notice to the Delhi Gymkhana Club directing it to explain why an eviction order should not be passed against it.

Monsoon session to start July 20

PRESS TRUST OF INDIA
New Delhi, July 4

THE MONSOON SESSION of Parliament will be held from July 20 to August 13, Parliamentary Affairs Minister Kiren Rijiju said on Saturday.

The 25-day session with 19 sittings comes after the ruling BJP's victories in West Bengal, Assam and Puducherry assembly polls. The aftermath of the rebellion in the Trinamool Congress (TMC) and Shiv Sena (UBT) will also play out in the forthcoming session. A decision by Lok Sabha Speaker Om Birla on the demands of 20 TMC and six Shiv Sena MPs seeking recognition as separate groups is awaited.

In a post on X, Rijiju said on the recommendation of the government, President Droupadi Murmu has summoned both the Houses of Parliament for the Monsoon Session 2026.

"The Session will commence on 20 July, 2026 and continue till 13 August, 2026 for meaningful debate, discussion and decisions on issues of national importance," he said. In the last session a Constitution amendment bill to implement reservation for women and increase the number of seats in the Lok Sabha was defeated.

The government is now redrafting the bill to possibly increase Lok Sabha seats of all states uniformly by 50%.

IMD PREDICTS EXTREME RAIN TILL JULY 6

Mumbai urged to stay indoors

PRESS TRUST OF INDIA
Mumbai, July 4

Commuters make their way through a waterlogged road amid heavy rainfall in Mumbai, on Saturday PTI

INCESSANT AND HEAVY rains threw life out of gear in Mumbai and its metropolitan region on Saturday, triggering incidents of road cave-ins, tree fall and house collapse, and disrupting road and rail traffic.

The Mumbai civic body on Saturday declared a holiday for the afternoon session in all schools and colleges across the metropolis after the IMD issued a red alert of extremely heavy rainfall. A BMC spokesperson said that the decision was taken keeping in mind the safety of students amid the forecast of extremely heavy rains.

Maharashtra CM Devendra Fadnavis said the IMD has forecast very heavy rainfall, thunderstorms significantly above normal in the affected region till July 6. "We have requested people to avoid travel if possible so that accidents caused by heavy rain and storms can be prevented," he said.

Central India to be covered in next 4 days

THE SOUTHWEST MONSOON is set to advance further into parts of the North Arabian Sea, Gujarat, the remaining areas of Haryana and Punjab, and more parts of Rajasthan over the next four days, the IMD said on Saturday.

"The monsoon is likely to continue in an active phase over the central parts of the country during the next four-five days," the IMD said.

—ANI

FROM THE FRONT PAGE

Semiconductor initiative gets fillip

THE SANAND FACILITY has been set up by CG Semi, a subsidiary of CG Power and Industrial Solutions, in partnership with Japan's Renesas Electronics and Thailand's Stars Microelectronics. The Union Cabinet had approved the project in February 2024 under the India Semiconductor Mission.

The plant is expected to generate around 5,000 direct and indirect jobs over the next five years. It has an initial production target of 200 million chips annually, which the company plans to scale up to 5 billion. The chips will be supplied to customers in India as well as overseas. With commercial production beginning at the plant, three semiconductor projects approved by the Centre have now become operational. Two more facilities are expected to commence production during the current year. Addressing the gathering, Modi said India was now moving beyond mobile phone manufacturing towards developing the semiconductor value chain. He said electronics production in the country has increased seven-fold since 2014, while electronics exports have grown eleven-fold during the same period. "First products, then components and now semiconductors...India is building the entire electronics value chain. This is the roadmap to Viksit Bharat. This is the next phase of Make in India," Modi noted.

"The Semicon India programme is gathering rapid momentum... Step by step. Brick by brick. Chip by chip," he said. The Prime Minister said the semiconductor industry would attract chip packaging companies, equipment suppliers, machine servicing firms, chemical manufacturers and startups, creating a broader high-technology manufacturing base around Sanand.

Modi said such clusters would open opportunities for young engineers. Union Electronics and Information Technology Minister Ashwini Vaishnaw said chips will be used in automobiles and industrial applications, while a significant portion will also be exported.

Why Creta remains king of midsize SUVs

CONSIDERING THAT THESE 63 variants cover a really wide price range of ₹10.9 lakh-₹20.06 lakh in petrol, ₹12.53 lakh-₹20.11 lakh in diesel, ₹19.03 lakh-₹20.1 lakh in N Line, and ₹18.03 lakh-₹24.7 lakh in electric, Creta remains in the consideration set of every car buyer with a ₹10-25 lakh budget. "It has achieved default-buy status in the Indian consumer psyche," a former Hyundai India executive told *FE*. "Despite half a dozen rivals hitting the market month after month, Creta is the gold standard of the segment." But this has possibly hit Hyundai India in an unexpected way. Even as Creta's sales have been growing – from 157,311 units in 2023, to 186,919 units in 2024, and 201,122 units in 2025 – the market share of Hyundai India has been shrinking. Financial year data from the Society of Indian Automobile Manufacturers shows that the market share has dropped from 14.6% in FY23 to just 12.6% in FY26. Industry observers pointed out that by focusing its marketing, production, and component capacities on Creta and, the SUV Venue, Hyundai has exposed the rest of its portfolio, allowing competitors to chip away at its other models.

HDBF Bank's Q1 advances up 15.4%

WITHIN THE OVERALL deposits, current account, savings account deposits grew 9.4% year-on-year to ₹10.26 lakh crore as of June 30.

The bank's period-end advances under management, which includes inter-bank participation certificates, bills rediscounted and securitisation/assignment, rose 12.4% year-on-year to ₹31.27 lakh crore from ₹27.82 lakh crore a year ago. On a sequential basis, it climbed 2.3% from ₹30.57 lakh crore as of March-end.

Telegram in fresh trouble, hauled up for film piracy

THE MOVE IS in sync with the government's current scrutiny of messaging and social media platforms on multiple fronts. Recently, the Ministry of Electronics and Information Technology (MeitY) had told Meta to pause its WhatsApp's username rollout, besides taking Instagram to task over ads allegedly promoting child sexual abuse.

Telegram, in particular, has drawn criticism for its channel-based architecture, which allows pirated files to be shared with thousands of subscribers almost instantly and makes conventional takedown requests more cumbersome.

The amendments made to the IT Rules in late 2025 have sharpened intermediaries' due diligence obligations and given authorities clearer power to demand structural fixes rather than one-off removals.

Meanwhile, Telegram's troubles aren't confined to India. The platform is facing separate legal scrutiny in around a dozen more countries, including a Russian probe into allegations that Telegram was being used to promote extremist content.

Micro dramas pulling major money

DIGITAL ENTERTAINMENT STARTUP Kuku Technologies, the parent company of Kuku TV and Kuku FM, which releases over 150 original micro-drama shows every month and has crossed 200 million downloads, recently filed for an IPO through the confidential route, seeking to raise up to ₹3,500 crore as per reports. The firm is reportedly targeting a valuation of up to ₹15,000 crore with a listing expected sometime later this financial year. To accelerate content production and strengthen its AI capabilities, Kuku raised $85 million in Series C funding in 2025, led by Granite Asia with participation from Vertex Growth Fund, Krafton, IFC, and Tribe Capital. Earlier this year, former Indian cricket captain Mahendra Singh Dhoni invested in the company and joined as a brand ambassador for Kuku TV.

Story TV, operated by entertainment startup Eloelo Group, is also expanding. In May, the platform launched Story TV Dailies, a serialised storytelling format inspired by TV soaps but delivered through vertical videos with daily episode releases and no fixed ending. The company believes the new offering can tap into a potential audience of more than 500 million viewers who increasingly consume content on smartphones. "We went from 1 micro drama a day in July 2025 to five a day (150+ a month today). In terms of overall growth, we have grown 10x month-on-month and would like to continue this momentum in 2026," said Saurabh Pandey, founder & CEO, Story TV. Overall, Story TV has built what it claims is India's largest micro-drama catalogue, with more than 1,500 titles across Hindi, Tamil, Telugu, Malayalam, and Kannada. It has crossed 10 crore downloads. ShareChat-backed QuickTV recently announced an annual investment commitment of ₹24 crore through its Moj Microdrama Challenge to support creators and expand production. "Users consume nearly 14 billion episodes every month, or approximately 450 million episodic plays daily. Several QuickTV originals have already crossed the 100-million-view mark, while titles such as *Mere 3 Shehzaade* and *Ghar Wapsi* have each surpassed 200 million views," said Ankush Sachdeva, co-founder and CEO of ShareChat, Moj, and QuickTV. Flick TV raised $2.3 million in seed funding from Stellaris Venture Partners; ReelSaga secured $2.1 million from investors including Picus Capital and Nazara Technologies; while MiniPix raised ₹2.4 crore in pre-seed funding to build regional-language vertical dramas.

Meanwhile, entertainment company GBM Studios has committed ₹15 crore to create production infrastructure and talent development programmes for micro dramas. Founder Dharmesh Sangani said, "The changing landscape of content consumption has created a massive demand for fast-paced, emotionally engaging, and mobile-first storytelling." The company aims to launch its own platform and achieve ₹100 crore in turnover within three years. JioStar has emerged as one of the biggest believers in micro dramas. The company integrated its micro-drama offering, Tadka, directly into JioHotstar. Kevin Vaz, CEO, Entertainment, JioStar, said the platform attracted nearly 100 million viewers within weeks of launching in April. The company has already launched more than 100 original vertical series titles in partnership with over 50 production houses and plans to expand its catalogue to nearly 1,000 titles by the end of the year. In 2026, Zee Entertainment approved an investment of up to ₹100 crore in optionally convertible debentures of its subsidiary ZBullet Enterprises, which operates Bullet, a micro-drama platform. Bullet recently launched Trinetra AI, designed as an integrated filmmaking and content intelligence platform.

Azim Lalani, co-founder and chief business officer at Bullet, said "The future of entertainment will belong to those who can combine creativity with intelligence. Trinetra AI is our attempt to build that bridge." Netflix has not fully entered micro drama format while Amazon MX Player launched Fatafat in March this year. Regional players, too, are in the fray. The Maran Group recently launched KadhaiShorts, Tamil Nadu's first dedicated micro-drama platform. The service debuted with six Tamil originals and already has more than 100 projects in production. "We see micro dramas not as a passing trend but as the next major entertainment format built for mobile-only consumption," said Karan Dayanidhi Maran, vice-chairman of Maran Group and founder of KadhaiShorts. The platform plans to expand into other languages while launching ten new vertical dramas every month. Alongside, the company also introduced KadhaiClub, a creator ecosystem with more than 12,000 members. As per the Ormax Media-Meta study, *Micro Dramas: The India Story*, viewers spend a median 3.5 hours per week watching micro dramas, with over 90% of viewing happening individually. According to the Lumikai *State of India Interactive Media Report*, micro dramas grew into a $300-million category in CY25 and are projected to reach $4.5 billion by 2030, representing a 31% CAGR. "Indian audiences are gravitating towards formats that are personalised, built for the smartphone, and micro dramas are a natural outcome of that shift," said Salone Sehgal, founder and managing partner, Lumikai. Investor conviction in India's micro drama segment strengthened significantly over the past two years, with 2025 recording $30.9 million across five funding rounds, a 6x increase since 2024.

"The rise in adoption is being driven by several structural factors like widespread smartphone usage, affordable data, and changing consumer preferences toward short form, vertical-format content that can be consumed during short breaks," said Neha Singh, co-founder of market intelligence platform Tracxn.

Gas curbs withdrawn

THE PROVISIONS OF the order had empowered the government to regulate production, sector-wise allocation, distribution and consumption of natural gas, including LNG and re-gasified LNG.

The rollback follows the resumption of shipping through the Strait of Hormuz under a ceasefire and continuing negotiations, easing concerns over supplies from West Asia. "The ongoing conflict in the Middle East that has resulted in the disruption of liquefied natural gas shipments through the Strait of Hormuz has been subject of a ceasefire and negotiations are ongoing, as part of which, sea traffic through the Strait of Hormuz has been permitted to be resumed," the petroleum and natural gas ministry said in a notification.

India had invoked emergency powers under the Essential Commodities Act after disruptions to LNG cargoes and force majeure declarations by suppliers reduced available gas, prompting diversion of supplies to priority consumers. Today's amendment formally deletes these operative controls. The decision effectively ends the government-directed allocation mechanism introduced during the crisis and allows gas suppliers to move away from emergency diversion arrangements as LNG cargoes resume.

पालघरमध्ये सहा पर्यटकांची सुटका

पालघर : पालघर जिल्ह्यातील तांदुळवाडी किल्ल्यावर दाट धुक्यामुळे रस्ता चुकल्यामुळे अडकलेल्या सहा पर्यटकांची सुटका करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिस अधीक्षक यतीश देशमुख यांनी शनिवारी दिली.

नालासोपारा, विरार आणि डहाणू येथील सहा पर्यटक शुक्रवारी तांदुळवाडी किल्ल्यावर फिरायला गेले होते. मात्र, किल्ल्यावरुन उतरताना मुसळधार पाऊस, दाट धुक्यांमुळे ते रस्ता चुकले. त्यानंतर, त्यांनी तातडीने ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधला. ही माहिती मिळताच सफाळा पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक कैलास खाडे, पोलिस शिपाई रमेश चौधरी, हरी चौधरी व लक्ष्मण भोये यांचे पथक तातडीने तांदुळवाडीच्या दिशेने रवाना झाले. त्यांनी स्थानिक पोलिस पाटील सुजीत पाटील यांच्याशी समन्वय साधला. त्यानंतर, सहाही पर्यटकांचा शोध घेत त्यांची सुटका केली. हे पर्यटक पालघरमधील दांडेकर महाविद्यालयाचे विद्यार्थी असल्याचे समोर आले.

पावसाळ्यात डोंगर, किल्ले, धबधबे आणि दुर्गम पर्यटन स्थळांना भेट देताना सर्व नागरिक आणि पर्यटकांनी सुरक्षिततेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी त्वरित मदतीसाठी '११२' या हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

राम मंदिर विश्वस्त मंडळाची उद्या बैठक

अयोध्या : अयोध्येतील राम मंदिर देणगी गैरव्यवहार प्रकरणात विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) प्राथमिक अहवालावर आणि त्यानंतर दोन विश्वस्तांनी दिलेल्या राजीनाम्यावर चर्चा करण्यासाठी 'श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट'च्या सदस्यांची उद्या (सोमवारी) बैठक होणार आहे.

मणि रामदास छावणीत दुपारी तीन वाजता ही बैठक होईल. या बैठकीत राम मंदिराच्या कामकाजाचे व्यवस्थापन पाहण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी नियुक्ती करण्याबाबतही चर्चा होण्याची शक्यता सूत्रांनी वर्तवली आहे.

या प्रकरणात आठ जणांना अटक झाली असून, ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा राजीनामा दिला आहे. गोपाल राव हेही वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

शेतकऱ्यांसाठी सुधारित पंतप्रधान पीक विमा योजना

३१ जुलैपूर्वी नोंदणी करण्याचे आवाहन

मुंबई, (प्रतिनिधी) : शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि इतर प्रतिकूल परिस्थितीमुळे होणाऱ्या उत्पादनातील नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळावे, या उद्देशाने राज्य सरकारने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित पंतप्रधान पीक विमा योजना लागू केली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ३१ जुलैपूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

सुधारित पीक विमा योजनेनुसार महसूल मंडळामध्ये अधिसूचित पिकाचे चालू वर्षातील सरासरी उत्पादन हे उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास संबंधित शेतकऱ्यांना विमा नुकसान भरपाईचा लाभ मिळणार आहे. खरीप हंगामासाठी भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारले, सोयाबीन, कापूस आणि खरीप कांदा अशा १४ पिकांचा योजनेत समावेश करण्यात आला आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी अन्नधान्य, कडधान्य आणि तेलबिया पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या केवळ २ टक्के विमा हप्ता भरावा लागणार आहे. कापूस आणि कांदा या व्यापारी पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्के हप्ता भरावा लागेल.

योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. शेतकरी नॅशनल क्रॉप इन्शुरन्स पोर्टलवर (एनसीआयपी) ऑनलाईन अर्ज करून सहभाग नोंदवू शकतात. तसेच, बँका, कॉमन सर्व्हिस सेंटर किंवा स्वतः ऑनलाईन अर्ज भरूनही योजनेचा लाभ घेता येणार आहे.

योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक बंधनकारक करण्यात आला असून, शेतकऱ्यांकडे जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक तसेच आधारशी संलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. याशिवाय, शेतकऱ्यांनी आपल्या पिकाची डिजिटल क्रॉप पाहणी करणे अनिवार्य आहे. डिजिटल क्रॉप पाहणीमध्ये नोंदविलेल्या पिकाची माहिती आणि विम्यासाठी अर्जात नमूद केलेल्या पिकामध्ये तफावत आढळल्यास डिजिटल क्रॉप पाहणीतील नोंद अंतिम मानली जाईल. तफावत सिद्ध झाल्यास संबंधित विमा अर्ज रद्द करण्यात येईल, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

डॉक्टर महिलेची आत्महत्या

(पान १ वरुन)

मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सुरुवातीला ओळख पटत नव्हती. मात्र, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केल्यानंतर मृत तरुणीची ओळख श्वेता रोकडे अशी पटली. त्यानंतर पोलिसांनी या घटनेची माहिती डॉ. श्वेता यांच्या कुटुंबीयांना दिली. डॉ. श्वेता यांनी इतके टोकाचे पाऊल का उचलले? या मागचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. या घटनेमागे काही घातपात आहे का? यासह सर्व संभाव्य शक्यता लक्षात घेऊन रावेत पोलिस तपास करत आहेत.

त्याच्याशी लग्न होणारच नाही...

(पान १ वरुन)

याशिवाय, कथित चॅटमध्ये काही छायाचित्रांही समावेश असल्याचा दावा केला जात आहे. त्या छायाचित्रांवरुन सिया ही चेतनसोबत डेटला गेल्याचा अंदाज समाज माध्यमांवर व्यक्त केला जात आहे. मात्र, या दाव्यांची स्वतंत्रपणे पडताळणी झालेली नाही. तपास यंत्रणा डिजिटल पुरावे, मोबाईल डेटा आणि संबंधित व्यक्तींची चौकशी यांच्या आधारे संपूर्ण घटनेचा तपास करत आहे. त्यामुळे प्रसारित होत असलेल्या कोणत्याही चॅट किंवा संदेशांबाबत अधिकृत माहिती समोर येईपर्यंत निष्कर्ष काढू नयेत, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात येत आहे.

मुंबई कोलमडली

(पान १ वरुन)

पावसामुळे अंधेरी सबवे वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. साकीनाका, चांदीवली आणि विलेपार्ले येथील रस्ते पाण्याखाली गेले होते. त्यामुळे वाहतूक थांबवण्यात आली होती. मागील २४ तासांत झाडपडीच्या ६३ घटना घडल्या. त्यापैकी १८ घटना पूर्व उपनगरांमध्ये आणि ३६ घटना पश्चिम उपनगरांमध्ये घडल्या. घर किंवा भिंत कोसळण्याच्या आठ घटनांचीही नोंद झाली.भायखळा येथील बाणेवाडी परिसरात दुमजली इमारत कोसळली. यामध्ये दोन पुरुष आणि एक महिला जखमी झाले. त्यांना जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अतिवृष्टी आणि पूरस्थितीचा मुकाबला करण्यासाठी १० जिल्ह्यांना १५ कोटी

मुंबई, (प्रतिनिधी) : पावसाळ्यात राज्यातील विविध जिल्ह्यांमधील संभाव्य पूरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एसडीआरएफ) तुकड्या तैनात करण्यात आल्या असून, त्यांच्या व्यवस्थेसाठी दीड कोटींचा निधी वितरीत करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याशिवाय, आपत्तीचा धोका असलेल्या १० जिल्ह्यांना प्रत्येकी १५ कोटींचा निधी देण्यात आला आहे.

मान्सून कालावधीत राज्यातील पूरप्रवण तसेच दरडप्रवण जिल्हे निश्चित करून संबंधित जिल्ह्यांमध्ये एनडीआरएफ आणि एसडीआरएफ दलाच्या तुकड्यांना तैनात करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रतिसाद दलाच्या पथकांना तैनाती दरम्यान जेवण, निवासाची व्यवस्था, वाहन व्यवस्था या इतर खर्चासाठी निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने घेतला आहे.

एनडीआरएफ म्हणजे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल हे देशाची प्रमुख आपत्कालीन बचाव यंत्रणा आहे. एनडीआरएफच्या देशात एकूण सोळा बटालियन असून महाराष्ट्रात पुणे व गोव्यासाठी पाचवी बटालियन आहे. पूर, दरड कोसळण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर या तुकड्या मुंबईसह रायगड, ठाणे, अशा राज्यातील विविध भागात तैनात केल्या जातात. प्रत्येक बटालियनमध्ये १८ स्वतंत्र बचाव पथके असतात. त्यात अभियंता, तंत्रज्ञ आणि प्रशिक्षित श्वान पथक असतो. या तुकड्यांकडे अत्याधुनिक बोटी, कटर, जॅक आणि पूरनियंत्रण साहित्य असते.

F.D.P. No.09/2025

IN THE COURT OF HON'BLE ADDL. SENIOR CIVIL JUDGE, ATHANI, AT : ATHANI.

BETWEEN :

1. Shri. Sachin Mahesh @ Maheshwar Kulkarni ----Applicant

AND :

1. Shri. Neetin Mahesh @ Maheshwar Kulkarni -----Respondent

Citation U/s. 5 Rule 20 (a) of CPC NOTICE TO DEFENDANT

Defendant Shri. Neetin Mahesh @ Maheshwar Kulkarni, Age : 50 years, Occ : Service, R/o : Anantapur, Tq : Athani, Dist : Belagavi, Now residing at A3 Lotus Building Bahes Complex Pune, Yamunanagar Maharashtra State.

WHEREAS, the applicant has filed the above case, for final decree of O.S.No. 64/2025 against respondent in respect of suit properties bearing 1) R.S.No. 129, measuring 29Ac-39Gts, 2) R.S.No.131/2, measuring 03Ac-09Gts 08 annas, and V.P.C. No. 635/A/1 situated at Anantapur village of Athani Taluka on the file of Hon'ble Addl. Senior Civil Judge Athani.

You are hereby called upon to appear before this court in person or through Advocate on 17-08-2026 at 11-00 am to answer in the above suit failing which in the said suit you will be placed ex-parte and the case will be disposed off.

Given under my hand and seal of this court on this 04 day of July 2026.

By Order of the Court

SEAL

Shri. B. I. Dhangi
Advocate for Applicant

Shirstedar
Court of Addl. Senior Civil Judge Athani

ठाकरे गटाचे आज 'रामरक्षा' आंदोलन

मुंबई, (प्रतिनिधी) : अयोध्येतील राम मंदिराच्या दानपेटीतील लुटीविरोधात ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतली असून, दादरच्या प्रभादेवीमध्ये निषेधार्थ दादर येथील पुरातन हनुमान मंदिर येथे आज (रविवारी) सायंकाळी 'रामरक्षा आंदोलन' करण्यात येणार आहे. मारुती मंदिरात महाआरती, रामरक्षा, हनुमान स्तोत्र आणि हनुमान चालीसाचे सामूहिक पठण करून आंदोलनाला सुरुवात होणार आहे. राम मंदिराचे भांडवल करून सत्ता मिळविणाऱ्या भाजपच्या राजवटीत राम मंदिराच्या दानपेटीवरच दरोडा घालता गेला. त्याविरोधात ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत राज्यव्यापी 'रामरक्षा' आंदोलनाचे रणशिंग फुंकले. आज सायंकाळी चार वाजता दादरमधील ऐतिहासिक मारुती मंदिरापासून या आंदोलनाचा धडाका सुरू होऊन गावागावात पसरणार आहे. पक्ष न पाहता सर्व हिंदू बांधव आणि रामभक्तांनी या चोरीचा जाब विचारण्यासाठी आंदोलनात उतरावे, अशी हाक उद्धव यांनी दिली आहे.

या आंदोलनात स्वतः उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, अनिल देसाई, अरविंद सावंत, आमदार अनिल परब, वरूण सरदेसाई, महेश सावंत यांसह लोकप्रतिनिधी, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

राजमाची-लोणावळा रस्त्यावर दरड कोसळली

(पान १ वरुन)

साधारण तीस ते पस्तीस दुचाकी व काही चार चाकी वाहने दरडीच्या दुसऱ्या भागात अडकल्या आहेत. आज (रविवारी) सकाळ पर्यंत ही दरड बाजूला करण्यात यश मिळेल, असे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, हा अपघात नसून प्रशासनाच्या दीर्घकाळाच्या दुर्लक्षाचा परिणाम असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. लोणावळ्यापासून अवघ्या १६ किलोमीटरवर असलेल्या राजमाचीसाठी आजही सुरक्षित आणि सर्वहंगामी रस्ता नाही. वर्षानुवर्षे निवेदने, आंदोलने आणि मागण्या करूनही कायमस्वरूपी उपाययोजना झालेली नाही. परिणामी प्रत्येक पावसाळ्यात राजमाचीचा संपर्क तुटतो आणि ग्रामस्थांसह पर्यटकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो.

राजमाची हे राज्यातील महत्त्वाचे पर्यटनस्थळ असूनही मूलभूत सुविधांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. पर्यटनातून महसूल हवा, पण रस्त्यासाठी निधी नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांकडून उमटत आहे. या घटनेमुळे फक्त रस्ता नव्हे, तर प्रशासनाच्या आश्वासनांचाही ढिगारा कोसळल्याची चर्चा राजमाची परिसरात रंगली आहे.

MAHARASHTRA SCOOTERS
BAJAJ

महाराष्ट्र स्कूटर्स लिमिटेड

CIN: L35912MH1975PLC018376

नोंदणीकृत कार्यालय: C/o. बजाज ऑटो लिमिटेड कॉम्प्लेक्स, मुंबई - पुणे रोड, पुणे, महाराष्ट्र - ४११०३५
दूरध्वनी: (०२०)७१५७ ६०६६ | **फॅक्स :** (०२०) ७१५० ५७९२
ईमेल आयडी : investors@msls.co.in | **संकेतस्थळ :** www.mahascooters.com

५१वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि ई-मतदानाची माहिती यांची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बुधवार, दिनांक २९ जुलै २०२६ रोजी सकाळी १०:४५ वाजता (आयएसटी) दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी देण्यात आलेल्या ई-एजीएम च्या सूचनेत नमूद केल्यानुसार कामकाज पार पाडण्यासाठी, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाकडून (एमसीए) दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी जारी करण्यात आलेल्या सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोजर रिक्वायरमेंट्स) विनियम, २०१५ ("सेबी लिस्टिंग विनियम") आणि वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या संबंधित इतर परिपत्रकांसहपठीत कंपनी अधिनियम, २०१३ ("अधिनियम") मधील लागू असलेल्या तरतुदींचे आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांचे पालन करत, कंपनीच्या सदस्यांची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("ए.जी.एम"), सदस्यांनी एका सार्वजनिक ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित न राहता, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) (यापुढे 'ई-एजीएम' म्हणून संबोधले जाईल) आयोजित केली जाणार आहे. सदर सूचना आणि २०२६ साठीचा वार्षिक अहवाल शुक्रवार, दिनांक २६ जून २०२६ रोजी शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना त्यांच्या नोंदणीकृत ईमेल आयडीवर शनिवार, दिनांक ४ जुलै २०२६ रोजी पाठविण्यात आला आहे.

सेबी लिस्टिंग विनियमांच्या विनियम ३६(१)(ब) अनुसार, आर्थिक वर्ष २०२६ साठीच्या व्यवसाय जबाबदारी आणि शाश्वतता अहवालासह आर्थिक वर्ष २०२६ चा वार्षिक अहवाल आणि ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाहण्यासाठी वेब-लिंक आणि क्यूआर कोड असलेले एक पत्र, त्याच्या अचूक मार्गासह दूरस्थ ई-मतदान करण्यासाठीच्या लॉगिन क्रेडेन्शियल्ससह कंपनी/केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड ('केफिन'), रजिस्ट्रार टू अँन इश्यू आणि शेअर ट्रान्सफर एजंट ('आरटीए')/ डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स यांच्याकडे स्वतःचा ईमेल पत्ता ज्या सदस्यांनी नोंदवलेला नाही, त्यांना पाठवले जात आहे. सदर दस्तऐवजांच्या प्रत्यक्ष प्रती, विनंती करणाऱ्या सदस्यांना मोफत उपलब्ध करून दिल्या जातील.

कंपनीच्या ५१व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल https://www.mahascooters.com/investors.html#annualReports या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उपरोक्त दस्तऐवज शेअर बाजारांच्या म्हणजे बीएसई लिमिटेड च्या www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या www.nseindia.com या संकेतस्थळांवर तसेच केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेडच्या https://evoting.kfintech.com/public/Downloads.aspx या संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध आहेत.

सेबी लिस्टिंग विनियमांच्या विनियम १२ मध्ये केलेल्या अलीकडील सुधारणेनुसार, उपरोक्त विनियमांतर्गत विहित केल्यानुसार कंपनीला फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने लाभांश देणे बंधनकारक आहे. त्यानुसार, सदस्यांनी नोंद घ्यावी की, कंपनीकडून यापुढे लाभांश देण्यासाठी वॉरंट्स, डिमांड ड्राफ्ट्स किंवा चेक्स जारी केले जाणार नाहीत.

संचालक मंडळाच्या, दिनांक २२ एप्रिल २०२६ घेण्यात आलेल्या सभेत, प्रत्येकी ₹१० दर्शनी किंमत असलेल्या प्रत्येक इक्विटी शेअरकरिता ₹ ६० (६००%) एवढा अंतिम लाभांश देण्याची शिफारस केली आहे. अधिनियमाच्या कलम १२६ च्या तरतुदींच्या अधीन राहून, इक्विटी शेअर्सवरील लाभांश जर ई-एजीएम मध्ये घोषित केला गेला, तर तो मंगळवार, दिनांक ३० जून २०२६ रोजी बाजार बंद होण्याच्या वेळेपर्यंत शेअर्स धारण करणाऱ्या सर्व सदस्यांना मंगळवार, दिनांक ४ ऑगस्ट २०२६ रोजी किंवा त्या सुमारास अदा केला जाईल.

अधिनियमाचे कलम १०८ आणि सुधारणा केल्यानुसार कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २०, आणि सेबी लिस्टिंग विनियमांचे विनियम ४४ आणि दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजीचे सेबी मास्टर परिपत्रक यांच्या तरतुदींचे पालन करत, सदस्यांना याद्वारे पुढे सूचित करण्यात येते की:

अ) कंपनी तिच्या सदस्यांना ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देत आहे जेणेकरून त्यांना ई-एजीएम च्या सूचनेत नमूद केलेल्या ठरावांवर इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदान करता येईल. केफिनला ई-एजीएम साठी ई-मतदान सेवा प्रदाता नियुक्त केले गेले आहे.

ब) दूरस्थ ई-मतदान करून किंवा ई-एजीएम मध्ये मतदान करून ई-एजीएम च्या सूचनेत नमूद केलेला व्यवसाय पार पाडला येईल.

क) दूरस्थ ई-मतदान हे **शनिवार, दिनांक २५ जुलै २०२६ (सकाळी ९:०० वाजता आयएसटी)** पासून सुरू करण्यात येणार असून **मंगळवार, दिनांक २८ जुलै २०२६ (सायंकाळी ५:०० वाजता आयएसटी)** रोजी संपणार आहे. मंगळवार, दिनांक २८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजल्यानंतर (आयएसटी) दूरस्थ ई-मतदान करता येणार नाही.

ड) **बुधवार, २२ जुलै २०२६ ('कट-ऑफ तारीख')** ही ई-मतदानाच्या उद्देशासाठी कट-ऑफ तारीख असेल. सदर तारखेला ज्या व्यक्तीचे नाव सदस्यांच्या नोंदवहीत किंवा लाभाधिकारी मालकांच्या नोंदवहीत नोंदवले गेले असेल, त्यास दूरस्थ ई-मतदान सुविधा तसेच एजीएम मध्ये ई-मतदान यांचा अधिकार असेल. कंपनीच्या पेड-अप इक्विटी शेअर कॅपिटल मध्ये सदस्यांनी धारण केलेल्या इक्विटी शेअर्सच्या प्रमाणात त्यांना मतदानाचे अधिकार असतील.

ई) सूचना पाठवली गेल्यानंतर शेअर्स खरेदी करून कंपनीचे सदस्य झालेल्या व्यक्तींना आणि कट-ऑफ तारखेनुसार म्हणजेच **बुधवार, दिनांक २२ जुलै २०२६** रोजी पात्र सदस्यांना केफिनकडून यूजर आयडी आणि पासवर्ड मिळविता येईल. त्यासाठी त्यांना त्यांच्या नोंदवलेल्या ईमेल-आयडी वरून evoting@kfintech.com वर त्यांची विनंती पाठवावी लागणार आहे. आपला ईमेल-आयडी नोंदवला नसलेल्या सदस्यांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे संपर्क करून तो अद्ययावत करून घ्यावा.

फ) दूरस्थ ई-मतदानासाठीचा यूजर आयडी आणि पासवर्ड ई-मेलद्वारे त्या सदस्यांना कळवला गेला आहे ज्यांनी त्यांचा ई-मेल पत्ता नोंदवलेला आहे. कंपनी किंवा केफिनकडे ई-मेल पत्ता नोंदवलेला नसलेल्या सदस्यांसाठी यूजर आयडी आणि पासवर्ड त्यांना पाठवलेल्या पत्रावर छापले गेले आहेत.

ग) असे सदस्य जे सभेला उपस्थित आहेत आणि ज्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे ठरावांवर आपले मतदान केलेले नाही असे सदस्य, एजीएम मध्ये दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यास पात्र असतील. सूचनेत ई-एजीएम मध्ये मतदान करण्याच्या सूचना प्रदान केल्या गेल्या आहेत.

घ) ई-एजीएम पूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे आपले मतदान केलेल्या सदस्यांना देखील ई-एजीएम मध्ये उपस्थित राहता येईल/भाग घेता येईल, परंतु त्यांना ई-एजीएम मध्ये पुन्हा मतदान करता येणार नाही.

च) ई-मतदान संबंधित कोणत्याही चौकशीसाठी / तक्रारीसाठी, सदस्यांना https://evoting.kfintech.com येथे वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि ई-मतदान वापरकर्ता मार्गदर्शक पाहता येतील. याशिवाय, सदस्यांना ई-मतदान संबंधित तक्रारी सोडवण्यासाठी सदस्य खाली दिलेल्या संपर्क तपशीलावर संपर्क साधता येईल:

मोहम्मद मोहसिनुद्दीन असिस्टंट व्हाईस प्रेसिडेंट – कॉर्पोरेट रजिस्ट्री केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड **युनिट : महाराष्ट्र स्कूटर्स लिमिटेड** सेलेनियम बिल्डिंग, टॉवर बी, प्लॉट क्र. ३१ - ३२, आर्थिक जिल्हा, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद, रंगारेड्डी, तेलंगणा, भारत - ५०० ०३२. **ईमेल आयडी:** mohsin.mohd@kfintech.com /einward.ris@kfintech.com टोल फ्री क्रमांक : १८०० ३०९ ४००१	**सौरभ एरंडे** कंपनी सचिव **महाराष्ट्र स्कूटर्स लिमिटेड** तिसरा मजला, पंचशील टेक पार्क विमान नगर, पुणे - ४११ ०१४ ईमेल आयडी: investors@msls.co.in दूरध्वनी क्रमांक: (०२०) ७१५७ ६४०३

छ) ज्या शेअरधारकांनी डीमटेरिअलाइज्ड स्वरूपात शेअर्स धारण केले आहेत, त्यांना डिपॉझिटरी(ज) (म्हणजेच, एनएसडीएल आणि सीडीएसएल) मार्फत ई-मतदान संदर्भातील कोणत्याही समस्यांसाठी, खाली दिलेल्या संपर्क तपशिलावर संपर्क साधता येईल.

एनएसडीएल	सीडीएसएल
ईमेल आयडी : evoting@nsdl.co.in टोल फ्री क्रमांक: ०२२ ४८८६ ७००० / ०२२ २४९९ ७०००	ईमेल आयडी: helpdesk.evoting@cdslindia.com टोल फ्री क्रमांक: १८०० २२ ५५ ३३

आपले ईमेल पत्ते न नोंदविलेल्या आणि परिणामी त्यांना आर्थिक वर्ष २०२६ साठीचा वार्षिक अहवाल, ५१व्या सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई-मतदानाचे लॉगिन क्रेडेन्शियल्स न दिले जाऊ शकणाऱ्या सदस्यांनी आपला ईमेल पत्ता आणि इतर केवायसी अद्ययावत करावेत, अशी विनंती आहे. यासाठी त्यांनी सहाय्यक दस्तऐवजांसह फॉर्म ISR-1 (https://www.mahascooters.com/investors.html#shareholders या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे) योग्यरित्या भरून आणि सही करून आवश्यक प्रत्यक्ष स्वरूपात धारण केलेल्या शेअर्ससाठी केफिनकडे सादर करावा. ही विनंती या संदर्भातील कायदेशीर आवश्यकतांचे पालन केल्याच्या अधीन राहून नोंदवली जाईल. डिमॅट स्वरूपात धारण केलेल्या शेअर्सच्या बाबतीत, सदस्यांनी उपरोक्त तपशील अद्ययावत करण्यासाठी त्यांच्या संबंधित डीपीकडे संपर्क साधावा, अशी विनंती आहे.

महाराष्ट्र स्कूटर्स लिमिटेड साठी
सही/-
सौरभ एरंडे
कंपनी सचिव

ठिकाण: पुणे
दिनांक: ४ जुलै २०२६